1778/17-07-18

६६३

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/ ३०१६ /२०१८.
दिनांक :- २७ /०७/२०१८.

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ मधील तरतूदीनुसार) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि उक्त प्राधिकरणासाठी स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. यश प्रॉपर्टीज यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.३०/१०/२०१७ रोजी प्रस्ताव दाखल केला आहे सदर प्रस्तावासोबत मशाल संस्थेने निश्चित केलेली झोपडीधारकांची सर्व्हेक्षणाची यादी जोडली असून त्यात एकुण ६१ झोपडीधारकांचा समावेश आहे. प्रस्तावासोबत एकुण ४४ झोपडीधारकांची संमती सादर केलेली आहे. त्याअनुषंगाने मे. यश प्रॉपर्टीज यांना ७२% झोपडीधारकांनी पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे; कार्यालयीन परिपत्रक क्र.२१५. दि.०१/०७/२०१७ नुसार या कार्यालयाकडील जा.क्र.झोपुप्रा/ सप्रा/कावि/२९६-शेवकर वस्ती/६९६/२०१७. दि.१८/०८/२०१७ अन्वये उपआयुक्त, परिमंडळ क्र.४, पुणे मनपा यांचे कडुन अनुसूचीत निर्दिष्ट जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पुढील कार्यवाहीसाठी झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीबाबत मागविणेत आलेला वस्तुस्थितीदर्शक, अहवाल त्यांचेकडील दि.२८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त असून त्यात, "सदरचा भाग मिश्रित कच्ची व पक्की बांधकामे आहेत. तसेच अंतर्गत रस्ते अरुंद असल्याने जातायेता त्रास होत असून झोपडीपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचे" नमुद करणेत आले आहे. तसेच उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१ यांनी विषयांकीत झोपडपट्टीची दि.१६/०१/२०१८ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन स्वतंत्र अहवाल सादर करुन त्यात, 'सदर जागी दाटीवाटीची कच्ची /पक्की घरे, अरुंद रस्ते, अपुरा सुर्यप्रकाश व हवा, अस्वच्छता इ. बाबी विचारात घेता, झोपडपट्टी घोषित करणेस अनुकूल परिस्थिती आहे,' असे नमुद केले आहे;

आणि ज्याअर्थी; (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारीत अधिनियम २०१८ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे

सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ मधील तरतूदीनुसार) अनुसुचिमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्रफळ झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पूर्वसुचना, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १४/०६/२०१८ पृष्ठ क्र. ०९ वर प्रसिध्द करणेत आले असून त्यास योजनाक्षेत्रतही प्रसिध्दी देणेत आली आहे. तसेच संबंधित जमिन मालकालाही सदरची पुर्वसुचना बजविणेत आली असून, त्याबाबत ३० दिवसांच्या (दि. १४/०७/२०१८अखेर) विहित मुदतीत सुचना / हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र उक्त कलमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी ,मी पांडुरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे,महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारीत अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) सुधारीत अधिनियम २०१८ च्या कलम ३ क (२) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, चौथा मजला, झोपुप्रा कार्यालय, मुंबई, प्रो. अनंत कणेकर मार्ग, बांद्रा (पु.) मुंबई- ५१. यांचेकडे अपील दाखल करता येईल आणि त्याबाबत शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.२९६/अ/१/४/२, हडपसर, शेवकर वस्ती, पुणे | ११७०.०० चौ. मी. | **पुर्वेस -** रस्ता व लागू स.नं. २९६ पैकी.<br>**पश्चिमेस -** रस्ता (१२ मी. डि.पी. रस्ता) व लागू स.नं. १२१<br>**उत्तरेस -** रस्ता (१२ मी. डि.पी. रस्ता)<br>**दक्षिणेस -** रस्ता (१८ मी. डि.पी. रस्ता) | मे. यश प्रॉप्रर्टिज प्रमोटर्स अण्ड डेव्हलपर्स, कोंढवे-धावडे, एन डी ए रोड, पुणे २३ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक - २०/०७/२०१८.